# ज. ए. इ. ची पूर्व प्राथमिक शाळा

## सुभेदार वाडा, कल्याण (प.)

## वार्षिक अहवाल

**डिसेंबर २०१६ ते डिसेंबर २०१७**

सस्नेह नमस्कार

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, गांधी चौक, कल्याण (प.) आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

* नोव्हेंबर १९९४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण येथे सुभेदार वाड्यात सुरू झाली. सध्या शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात नर्सरीचे ४ वर्ग, छोटा शिशु वर्गाचे ४ वर्ग, मोठ्या शिशु वर्गाचे ३ वर्ग असून एकूण ४३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १ मुख्याध्यापिका, ९ सहाय्यक शिक्षिका, १ संगीत शिक्षिका, १ लिपिक, ५ सेविका, ४ हंगामी शिक्षिका व १ हंगामी सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते. १५ जुलै २००७ रोजी सौ. सुवर्णा मारुती पाटील (सहाय्यक शिक्षिका) या पूर्व प्राथमिक भिवंडी या शाळेतून बदली होऊन आल्या.
* शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. उदा. आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांची दिंडी, दीपपूजा, रक्षाबंधन, बैलपोळा, नागपंचमी, दहीहंडी, संक्रांत (तीळगुळ समारंभ), शेकोटी, दसरा, भोंडला, शारदोत्सव, रंगपंचमी, होळी इ. दर चार महिन्यांनी विद्यार्थ्यांचे सामुहिक वाढदिवस होमहवन करून, गायत्रीमंत्र म्हणून साजरे केले जातात. जुलै महिन्यापासून मुलांना दर बुधवारी पौष्टिक खाऊ दिला जातो.
* कॅमलिन चित्रकला स्पर्धा गुरुवार दि. २८/७/२०१७ रोजी घेण्यात आल्या. यात पुढील विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली. - कु. फडके देवेश संजय (प्रथम), कु. जांभळे कस्तुरी महेंद्र (द्वितीय), कु. गाडेकर रितिषा नरेश (तृतीय), कु. काळे हर्ष (उत्तेजनार्थ), कु. भंडार आर्यन भालचंद्र (उत्तेजनार्थ).
* अथर्व ट्रस्ट तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला व रंगभरण स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी सन्मानचिन्हं व प्रमाणपत्रं स्वरुपात पारितोषिके मिळविली. - कु. पाटील श्रद्धा महेंद्र (रंगभरण), कु. राठोड अंकिता धीरज (रंगभरण), कु. शेलार देविका संजय (रंगभरण), कु. मोरे आर्यन शशिकांत (चित्रकला). तसेच सौ. रश्मी रविकिरण दिघे (सहाय्यक शिक्षिका) यांना 'कलाश्री' कलाटिचर म्हणून सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.
* जायंट्स ग्रुप ऑफ कल्याण मेट्रो तर्फे घेण्यात आलेल्या तीनचाकी सायकल स्पर्धेत कु. खोमणे आरुष गणेश (मोठा गट) या विद्यार्थ्याला प्रथम क्रमांकमिळाला. त्याला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.
* शुक्रवार दि. २१ जुलै २०१७ रोजी वैद्य एज्युकेशन ट्रस्ट नाशिक यांचेतर्फे रंगभरण स्पर्धेचे आयोजन केले.
* शनिवार दि. १० डिसेंबर रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आले होते. विषय - ईशभक्ती. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मनिष बोरसे यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. श्री. राधाकृष्ण पाठक (संचालक मंडळ सदस्य) यांनी भूषविले.
* शनिवार दि. ७ जानेवारी रोजी एन्जॉय फार्म हाऊस, पांजरपोळ, भिसाळ येथे नर्सरी ते मोठा गट शिशु सहल नेण्यात आली होती.
* शुक्रवार दि. १६ डिसेंबर २०१६ रोजी एल्. आय. सी. या कंपनीला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कपनीतर्फे प्ले ग्रुप ते मोठा शिशूच्या विद्यार्थ्यांच्या रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आल्या त्यात पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके

मिळाली. ही बक्षिसे गुरुवार दि. १२ जानेवारी रोजी बक्षीस वितरण समारंभ घेऊन देण्यात आली. नर्सरीच्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. छोटा गट : कु. पाटील कनिष्का शशिकांत (प्रथम), कु. मोरे गार्गी गणेश (द्वितीय), कु. सावंत श्रावणी प्रदीप (तृतीय). मोठा गट : धामणकर दीप्ती संदीप (प्रथम), कु. पाटील हिमांशी महेश (द्वितीय), कु. गाडेकर रितिषा नरेश (तृतीय).

* बुधवार दि. १८ जानेवारी २०१७ रोजी 'नाना-नानी डे' साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना आजी-आजोबांच्याही कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध खेळांचे व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. सी. एम्. पुराणिक सर (माजी कोषाध्यक्ष) यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच खास आजी-आजोबांच्या मनोरंजनासाठी सौ. मनिषाताई, दिपालीताई, सौ. नीता ताई यांनी जुनी भावगीतं, भक्तीगीतं सादर केली. तीळगूळ समारंभ करून विद्यार्थ्यांनी तयार केलेली भेटकार्ड सर्व आजी-आजोबांना देण्यात आली.
* शनिवार दि. २१ जानेवारी २०१७ रोजी 'आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सुभेदार वाडा हायस्कूल मुख्याध्यापिका मा. सौ. अर्चना कदम मॅडम यांनी केले. आनंद मेळाव्यात ३१ स्टॉल लावण्यात आले होते.
* शनिवार दि. ४ फेब्रुवारी २००७ रोजी पालक-शिक्षक संघातर्फे घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेचा बक्षीस समारंभ (बालवाडी ते इ. ४ थी) करण्यात आला. पाहुणे म्हणून मा. श्री. अशोक सोनार सर (हायस्कूल, सुभेदार वाडा, ज्येष्ठ शिक्षक) तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. श्री. राधाकृष्ण पाठक (प्राथमिक विभाग, शालेय समिती अध्यक्ष, सुभेदार वाडा) यांना निमंत्रित करण्यात आले होते.
* शुक्रवार दि. २४/३/२०१७ ते ८/४/२०१७ पर्यंत छोटा शिशु व मोठा शिशु गटाच्या वार्षिक तोंडी व लेखी परीक्षा घेण्यात आल्या.
* शनिवार दि. १ जुलै २०१७ रोजी पर्यावरण सप्ताहानिमित्त शाळेच्या वेळेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला.
* शनिवार दि. ८ जुलै २०१७ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त शाळेच्या वेळेत बालसभा घेण्यात आली. सदर कार्यक्रम विद्यार्थ्यांनी साजरा केला.
* मंगळवार दि. १ ऑगस्ट लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त स्पर्धा घेण्यात आल्या.

  नर्सरी : कमरेवर हात ठेऊन उड्या मारत येणे

  कु. चौधरी केतकी रितेश (प्रथम), कु. वडगावे योगेश्वरी श्रीधर (द्वितीय), हेगिष्टे पार्थ दिनेश (तृतीय),
  कु. नानल चैतन्य अमोल (उत्तेजनार्थ)

  छोटा शिशू : बेडूक उड्या

  कु. चौधरी स्वरांगी शशिकांत (प्रथम), कु. पाटील डिंपल किरण (द्वितीय),
  कु. पोखरकर उत्कर्ष नवनाथ (तृतीय), कु. पाटील संस्कृती श्रीमय (उत्तेजनार्थ)

  मोठा शिशू : सांगितलेले मणी मोजून आणणे (१ ते १० पर्यंत)

  कु. गायकवाड ऐश्वर्या गणेश (प्रथम), कु. भंडारी संवेद राजेंद्र (द्वितीय), कु. गायकवाड रिया रमेश (तृतीय)
* बुधवार दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी नवनीत मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धा शाळेच्या वेळात घेण्यात आली. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

  कु. पाटील संस्कृती श्रीमय (छोटा शिशु), कु. गोडसे अनुष्का गणेश (छोटा शिशु), कु. येवले तन्मय उमेश (मोठा शिशु), कु. कुंभार युवराज दिनेश (मोठा शिशु), कु. तांबोळे आशिता सचिन (मोठा शिशु), कु. कोळेकर वैभव अशोक (मोठा शिशु)
* शनिवार दि. १९ ऑगस्ट २०१७ रोजी मातृदिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. नर्सरीच्या शिक्षिकांनी ज्येष्ठ शिक्षिका सौ. निलिमा भाभे यांना व मोठ्या, छोट्या शिशुच्या सर्व शिक्षकांना औक्षण करून विद्यार्थ्यांनी तयार केलेले भेटकार्ड दिले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी आईला औक्षण करून, भेटवस्तू देऊन वंदन करण्यास सांगितले.

* शिक्षक पालक संघातर्फे मातृदिनानिमित्त २१ ऑगस्ट रोजी माता पालकांसाठी खास 'संगीत टोपी' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पुढील महिला पालकांना पारितोषिक मिळाले.- सौ. कातकडे योगिता बाळकृष्ण(प्रथम), सौ. पवार अंजली योगिराज (द्वितीय), सौ. म्हात्रे रुपाली दिनेश (तृतीय), सौ. डावखर शोभा उमाजी (उत्तेजनार्थ).
* माता पालकांसाठी डॉ. श्रीकांत गावडे (आयुर्वेद तज्ञ) यांचे बालकांचा आहार व आरोग्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
* मंगळवार दि. २२ ऑगस्ट २०१७ रोजी 'श्री गणेश चतुर्थी' होती. श्री गणरायाच्या आगमनानिमित्त अष्टविनायक दर्शन देखावा मांडण्यात आला होता. नैवेद्याच्या विविध पदार्थांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.
* शारदोत्सवात डॉ. श्रीकांत गावडे (आयुर्वेद तज्ञ) यांचे 'महिलांचे आरोग्य व काळजी' या विषयावर महिला पालकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
* गुरुवार दि. २८ सप्टेंबर २०१७ रोजी वैद्य ट्रस्ट तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचा बक्षीस समारंभ आयोजित करण्यात आला होता. सदर बक्षिसे डॉ. श्रीकांत गावडे यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आली. बक्षीसपात्र विद्यार्थी पुढीलप्रमाणे

  नर्सरी : कु. हेगिष्टे पार्थ दिनेश, कु. दांडेकर ध्रुव संतोष, कु. बोराडे किमया संतोष

  छोटा शिशु : कु. जाधव श्रेयस श्रीकांत, कु. भोई जीविका विनोद, कु. शिंपी समीक्षा दिनेश

  मोठा शिशु : कु. जाधव मितेज सचिन, कु. भंडारी संवेद राजेंद्र, कु. बोराडे दीक्षा संतोष
* शनिवार दि. २३ सप्टेंबर२०१७ रोजी एल्. आय. सी. तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. बक्षीसपात्र विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

  छोटा शिशु - कु. पाटील संस्कृती श्रीमय, कु. मोहिते आर्या नामदेव, कु. पवार सौम्या सुनिल

  मोठा शिशु - कु. वाघमारे समृद्धी राया, कु. धामणकर कल्पेश संतोष, कु. येवले तन्मय उमेश.

  नर्सरीच्या व प्ले ग्रुपच्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. सर्व शिक्षिकांनी गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच पालकांना विद्यार्थ्यांच्या एल्.आय.सी पॉलिसी घेतल्याबद्दल त्यांचेतर्फे शाळेस रु. पंधरा हजाराची खेळणी बक्षिसे म्हणून देण्यात आली. मा. मुख्याध्यापिका सौ. रसिका य. जांभुळकर यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.
* छोटा शिशु व मोठा शिशुची सहामाही तोंडी व लेखी परीक्षा दि. ६/१०/२०१७ ते १२/१०/२०१७ या कालावधीत घेण्यात आली.
* शुक्रवार दि. १३ ऑक्टोबर रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी दिवाळी सण व फराळाचे पदार्थ दृष्य स्वरुपात मांडण्यात आले. शिक्षकांनी तयार केलेली भेटकार्ड सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आली.
* बुधवार दि. ५ सप्टेंबर २०१७ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पूर्व प्राथमिक विभाग, सुभेदार वाडा, कल्याण शालेय समिती अध्यक्ष श्री. प्रकाश ओक सर होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राथमिक विभाग, सुभेदार वाडा, कल्याण शालेय समिती अध्यक्ष श्री. राधाकृष्ण पाठक सर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

  दरवर्षीप्रमाणे शिक्षकांच्या स्पर्धा घेण्यात आला.

  स्पर्धा - दोन मिनिटात जास्तीत जास्त सणांची नावे लिहिणे.

  यात पुढील शिक्षकांनी पारितोषिके मिळविली. - सौ. विद्या राजेश राणे (प्रथम), सौ. जयश्री अशोक सोनार (द्वितीय), श्रीमती वैशाली विवेक देवळे (तृतीय)
* मंगळवार दि. १४ नोव्हेंबर रोजी बालदिनानिमित्त पालक शिक्षक संघातर्फे विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

  नर्सरी - बेडूक उडी, छोटा शिशु - कंपास भरून आणणे, मोठा शिशु - [illegible]

* ११ सप्टेंबर २०१७ रोजी 'ऋतू व कपडे' हा उपक्रम साजरा करण्यात आला.
* मंगळवार दि. २१/११/२०१७ ते २४/११/२०१७ या सप्ताहात धान्यांचा आठवडा सादर करण्यात आला. तृणधान्य, कडधान्य, डाळी, उपवासाचे पदार्थ सर्व दृष्य स्वरुपात मांडणी करून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपक्रम घेण्यात आला.
* सोमवार दि. २७/११/२०१७ रोजी प्ले ग्रुप ते मोठा शिशु या सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यासाठी डॉ. श्रीकांत गावडे (आयुर्वेद तज्ञ) यांना आमंत्रित करण्यात आले होते.
* मंगळवार दि. २८/११/२०१७ रोजी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नर्सरी ते मोठा शिशुच्या सर्व स्पर्धा शाळेच्या वेळेत घेण्यात आल्या.

  नर्सरी : मुली - मणी ओवणे, मुलगे - धावत येणे

  सामुहिक : भौमितिक आकार आणणे.

  छोटा शिशु : मुली - धान्यातून नावे काढणे, मुलगे - विठ्ठल उडी मारणे,

  सामुहिक - सांगितलेली वस्तू आणणे

  मोठा शिशु : मुली - नागमोडी रेषेवरून चालणे, मुले - लंगडी घालत येणे

  सामुहिक - वही डोक्यावर घेऊन चालत येणे
* शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतकांनी संस्थेकडे काही ठेवी ठेवलेल्या आहेत. त्यातूनच लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त घेण्यात येणाऱ्या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येतात. तसेच कु. वरद आनंद सुळे याचे पालक श्री. आनंद सुळे यांनी कु. प्रणव शेलार या गरजू विद्यार्थ्यांची रु. ४,१७०/- ही संपूर्ण फी भरली. तसेच नर्सरीच्या पालकांचेही सहकार्य वेळोवेळी लाभले. अशाप्रकारे या विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाचा उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था, शिक्षक, पालक सतत प्रयत्न करीत आहे. त्यांस यश मिळावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

धन्यवाद!

**सौ. रसिका यशवंत जांभुळकर**

मुख्याध्यापिका

ज. ए. इ. ची. पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण (प.)

संकलन : सौ. अपर्णा प्रशांत पुराणिक (सहाय्यक शिक्षिका)